सन २०१६-१७ व सन २०१७-१८ मध्ये महावितरण कंपनीने कृषिपंपाना ८ ते १० तासांऐवजी १२ तासांचा वीज पुरवठा केल्यामुळे वीजदर सवलतीपोटी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना द्यावयाचे अर्थसहाय्य. सन २०१८-२०१९ (कार्यक्रम खर्च)

महाराष्ट्र शासन
ऊद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र.निधिवि-२०१७/प्र.क.७२/ऊर्जा-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : २४ मे, २०१८

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क्र.३६५/ऊर्जा-५, दि.०५ जानेवारी, २०१८, दि. ०३, मे, २०१८ व दि.०५ मे, २०१८.
२) शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र. ६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८.
३) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचे पत्र क्र. पी-कॉम./लेखा/कृषी १२ तास वी.पु./अनुदान/१००६७, दि.०३ मे, २०१८.

प्रस्तावना :-

सन २०१६-१७ मध्ये पावसाळ्याच्या कालावधीत माहे ऑगष्ट, २०१६ मध्य पावसाने दडी मारल्याने राज्यातील उभी पिके करपून जाऊ नये यासाठी उपयुक्त पाणीसाठ्याचा शेती सिंचनासाठी वेळेत वापर होण्याच्या दृष्टीने राज्यातील विविध भागातील लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांची मागणी विचारात घेऊन राज्यातील पीक परिस्थितीनुसार कृषीपंपाना १२ तास थ्री फेज अतिरीक्त वीजेचा पुरवठा देण्याची कार्यवाही महावितरण कंपनीमार्फत करण्यात आली होती. सदर कालावधीतील वाढीव वीज पुरवठ्यासाठी महावितरण कंपनीस आलेल्या अतिरिक्त रु.११५४.०३ कोटी या रकमेची प्रतिपूर्ती करण्याबाबत संदर्भ क्रमांक १ मधील दि. ०३ मे, २०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदर कालावधीतील वाढीव वीज पुरवठ्यासाठी महावितरण कंपनीस आलेल्या अतिरीक्त खर्च रु.११५४,०३,००,०००/- (रुपये एक हजार एकशे चौपन्न कोटी तीन लाख फक्त) इतका निधी महावितरण कंपनीस रोखीने वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१६-१७ मध्ये राज्यातील पीक परिस्थितीनुसार कृषीपंपाना १२ तास थ्री फेज अतिरीक्त वीजेचा पुरवठा देण्याची कार्यवाही महावितरण कंपनीमार्फत करण्यात आल्यामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना देय असलेल्या वीजदर सवलतीच्या अनुदानाची रक्कम रु.११५४,०३,००,०००/- (रुपये एक हजार एकशे चौपन्न कोटी तीन लाख फक्त) रोखीने वितरीत करण्यास या निर्णयाद्वारे शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. उपरोक्त प्रयोजनासाठी होणारा खर्च “मागणी क्रमांक के-६, २८०१ वीज, ०५ पारेषण व वितरण, ८०० इतर खर्च, (००) (०१) कृषी विषयक व यंत्रमाग विषयक प्रशुल्क कमी करण्यासाठी वीज वितरण / पारेषण अनुज्ञप्तीधारकांना अर्थसहाय्य (योजनेत्तर) (२८०१२६१५) ३३ अर्थसहाय्य” या लेखाशिर्षा खाली खर्ची टाकावा

व तो सन २०१८-१९ या वित्तीय वर्षासाठी रु.४९४१.११ कोटी इतक्या मंजूर असलेल्या अर्थसंकल्पीत तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. सदरची रक्कम अधिदान व लेखा अधिकारी यांच्या मार्फत कोषागारातून काढून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री.वि.म.राजुरकर, अवर सचिव व नियंत्रण अधिकारी म्हणून श्री. अ. मा. आत्राम, सह सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना मंजूर झालेली रक्कम रु.११५४,०३,००,०००/- (रुपये एक हजार एकशे चौपन्न कोटी तीन लाख फक्त) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई येथून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांच्या नावे स्वतंत्ररित्या धनादेश काढून वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

४. महाराष्ट्र विनियोजन अधिनियम २०१८/परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २ एप्रिल, २०१८ च्या परिशिष्टामधील अनुक्रमांक ७ व ८ मधील तपासणी सूची मधील अटींची तसेच परिच्छेद क्रमांक ७ व ९ मधील प्रत्येक अटीची पूर्तता झाल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

५. या लेखाशीर्षाखाली निधी वितरीत करण्यासाठी सादर करण्यात आलेल्या देयकाच्या अनुषंगाने प्रमाणित करण्यात येते की, या लेखाशीर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही तसेच उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित नाही. सदर शासन निर्णय, नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ९७/१४६१, दि.१५/०५/२०१८ व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १२०/१८/व्यय-१६, दि.२१/०५/२०१८ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार तसेच वित्त विभागाच्या क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८ च्या परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात प्रधान सचिव (उर्जा) यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१८०५२४१४४३००४११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vilas Mahadeorao Rajurkar

Digitally signed by Vilas Mahadeorao Rajurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=83469494bac86099a320f3e14bf8421ee9d2b48e344470b76ea2595df04951b4, serialNumber=02c5c00269dd48836be0d9939bdff848a9ff1f1a9fd195baf3a104d09b0817d9, cn=Vilas Mahadeorao Rajurkar
Date: 2018.05.24 14:43:23 +05'30'

(वि.म.राजुरकर)
शासनाचे अवर सचिव

प्रत:-

१) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधार कंपनी मर्यादित, हॉंगकॉंग बँक बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.
२) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे, मुंबई ४०००५१
३) सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर नं.१, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई-०५.
४) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) , महाराष्ट्र राज्य , मुंबई ४०००२०

५) महालेखापाल (लेखा परिक्षा), , महाराष्ट्र राज्य , मुंबई ४०००२०
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर .
७) अधिदान व लेखा अधिकारी,(रालेवि/अराप), मुंबई ४००००१
८) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, वांद्रे (पुर्व), मुंबई-४०० ०५१.
९) अवर सचिव रोख शाखा, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय मुंबई ४०००५१
१०) विशेष कार्य अधिकारी (ऊर्जा-५), उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय मुंबई ४०००५१
११) क.अ. प्रशासन -१, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई ४००३२
१२) वित्त विभाग, अर्थसंकल्प-१४, व्यय -१६) मंत्रालय मुंबई ४००३२
१३) मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, ३ रा मजला, प्रशासकीय इमारत, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर मुंबई.
१४) निवडनस्ती (ऊर्जा-३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -४०००३२.